**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

नॅक मानांकित 'अ' श्रेणी

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

**Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik**

NAAC Accredited 'A' Grade

Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dr_estb@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230051

आस्थापना कक्ष / Establishment Section

जा. क्र. यचममुवि/आस्था/परिपत्रक/2024/1372 दिनांक - 25.11.2024

## परिपत्रक

मा. कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने संविधान दिनानिमित्त खालील तपशीलाप्रमाणे (झूम प्लॅटफॉर्म) ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

विषय - भारतीय संविधानाची 75 वर्षे

व्याख्याते - नागेश जाधव, मुंबई

दिनांक - 26 नोव्हेंबर, 2024

वेळ - सकाळी 11.30 वाजता.

सर्व नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी / कर्मचारी, करारावरील शैक्षणिक सल्लागार, शैक्षणिक संयोजक आणि कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी खालील क्यू आर कोड स्कॅन करून सदर व्याख्यानात सहभागी व्हावे, ही विनंती.

Meeting ID: 836 7021 1358
Passcode: samvidhan (संविधान)

उपकुलसचिव
आस्थापना कक्ष

प्रत - माहितीसाठी व उचित कार्यवाहीस्तव

01. मा. कुलगुरू यांचे कार्यालय
02. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय
03. सर्व विभाग / केंद्र / कक्ष / विद्याशाखा, प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास सदरचे परिपत्रक आणून द्यावे.
04. सर्व मा. वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, विभागीय केंद्र - अमरावती / छत्रपती संभाजी नगर /मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे/ कोल्हापूर/ नांदेड यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेले सर्व अभ्यासकेंद्र व विद्यार्थी यांना सदरचे परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.

# नाशिक

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन

## संविधान दिनानिमित्त
## विशेष व्याख्यान

# "भारतीय संविधानाची
# 75 वर्षे"



SCAN ME

FOR ZOOM

| मंगळवार<br>26 नोव्हेंबर 2024 | वेळ: सकाळी 11:30 वाजता<br>प्लॅटफॉर्म: झूम (ऑनलाईन) |
|---|---|

भारतीय संविधानाला यावर्षी 75 वर्षे पूर्ण होत आहेत, ही देशासाठी गौरवाची गोष्ट आहे. 26 नोव्हेंबर 1949 रोजी आपण संविधानाचा स्वीकार केला व 26 जानेवारी 1950 रोजी ते अंमलात आले आणि भारत प्रजासत्ताक बनला. संविधानाने सामाजिक समता, न्याय, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही मूल्यांना बळ दिले. संविधानाच्या माध्यमातून शोषित, वंचित आणि दुर्बल घटकांना अधिकार प्रदान करण्यात आले. 75 वर्षात संविधानाने भारताच्या प्रगतीसाठी मजबूत पाया घालण्याचे काम केले. संविधान भारताच्या विविधतेतील एकतेचे प्रतीक आहे.

व्याख्याते

**नागेश जाधव (मुंबई)**

JOIN BY ZOOM

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India


संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475

मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

दिनांक : २६/११/२०२४

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन

## भारतीय संविधान दिन - अहवाल






डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक च्या वतीने दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११:३० वा. भारतीय संविधान दिनानिमित्त 'भारतीय संविधानाची ७५ वर्ष' या विषयावर ऑनलाईन माध्यमातून विशेष व्याख्यान आयोजित केले होते. या विशेष व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते नागेश जाधव, संविधान प्रचारक (मुंबई) उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख तथा मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर होते. याप्रसंगी शैक्षणिक समन्वयक डॉ. सुनील गावंडे यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय तथा कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सदर व्याख्यानाची सुरुवात भारतीय संविधानातील उद्देशपत्रिकेच्या वाचनाने झाली. प्रमुख वक्ते श्री. नागेश जाधव यांनी 'भारतीय संविधानाची ७५ वर्ष' या विषयावर उपस्थितांना व्याख्यान दिले.

श्री. जाधव यांनी व्याख्यानातून भारतीय संविधानाची पार्श्वभूमी, संविधानातील मुलभूत हक्क, संत, महापुरुषांचा समतेचा व बंधुतेचा विचार भारतीय संविधानात आहे, असे सांगितले. तसेच लोकशाही मूल्य, शोषित व दुर्लक्षित घटकांचा विकास, भारतातील सामाजिक विषमतेवर मात करण्यासाठी संविधानातील तत्वांची अंमलबजावणी, सामाजिक न्याय, भारतीय संविधानाची वाटचाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार व प्रासंगिकता असे मुद्दे त्यांनी व्याख्यानातून मांडले. भारतीय संविधान हाच सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. शेवटी श्रोत्यांच्या प्रश्नांची उत्तरे व्याख्यात्यांनी दिली.

सदर व्याख्यानास बहुसंख्य श्रोते ऑनलाईन झूम च्या माध्यमातून उपस्थित होते,

शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी व्याख्यानाचा अध्यक्षीय समारोप केला. शैक्षणिक समन्वयक डॉ. सुनील भारोडकर यांनी आभार व्यक्त केले. व सदर व्याख्यानाचा समारोप झाला.

26/11/2024

प्रा. नागार्जुन वाडेकर
प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन

डॉ. बाबासाहेब
आंबेडकर अध्यासन
30/11/24

देशदूत
www.deshdoot.com
शनिवार, दि. ३० नोव्हेंबर २०२४

# भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ ग्रंथ : जाधव

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय संविधानाची पार्श्वभूमी, संविधानातील मूलभूत हक्क, संत, महापुरुषांचा समतेचा व बंधुतेचा विचार भारतीय संविधानात आहे, भारतीय संविधान हाच सर्वश्रेष्ठ ग्रंथ असल्याचे प्रतिपादन प्रमुख वक्ते नागेश जाधव यांनी केले.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने भारतीय संविधान दिनानिमित्त 'भारतीय संविधानाची ७५ वर्ष' या विषयावर ऑनलाईन माध्यमातून विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या विशेष व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते नागेश जाधव, संविधानाचे अभ्यासक (मुंबई) उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख तथा मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर होते. याप्रसंगी शैक्षणिक समन्वयक डॉ. सुनील गावंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. व्याख्यानाची सुरुवात भारतीय संविधानातील उद्देशपत्रिकेच्या वाचनाने झाली.

नागेश जाधव यांनी लोकशाही मूल्य, शोषित व दुर्लक्षित घटकांचा विकास, भारतातील सामाजिक विषमतेवर मात करण्यासाठी संविधानातील तत्वांची अंमलबजावणी, सामाजिक न्याय, भारतीय संविधानाची वाटचाल, डॉ. आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार व प्रासंगिकता असे मुद्दे मांडले. शेवटी श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. व्याख्यानास बहुसंख्य श्रोते ऑनलाईन माध्यमातून उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी व्याख्यानाचा अध्यक्षीय समारोप केला. शैक्षणिक समन्वयक डॉ. सुनील भारोडकर यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन आणि कुलसचिव दिलीप भरड यांचे मार्गदर्शन लाभले.